# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 286 /2020 दिनांक: 09 /05/2020

प्रति,

1. पोलीस अधीक्षक, अकोला
2. आयुक्त, अकोला महानगरपालिका अकोला
3. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अकोला
4. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय अकोला
5. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,अकोला

**विषय - प्रतिबंधात्मक (Containtment Zone) क्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कुटूंब व कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी Containtment plan for large Outbreks " Novel Corornavirus Disease 2019 ( Covid -19) यामध्ये कोरोणा विषाणूने बाधीत झालेल्या व आढळलेल्या रुग्णाच्या परिसरामध्ये करावयाच्या उपाययोजना बाबत खालील प्रमाणे मागदर्शक तत्वे नमूद केली आहेत.

1. ज्या क्षेत्रास प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे. त्या क्षेत्रामध्ये सतत पाळत ठेवणे.
2. सदर क्षेत्रामध्ये High Risk व Low Risk असलेल्या रुग्णांची यादी तयार करुन त्यंचे माऊथ स्वॅब तात्काळ प्रयोगशाळेमध्ये तपासणी करिता पाठविणे.
3. बाधीत अथवा संशयीत रुग्ण आढळल्यास त्यास तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.
4. संबंधीत क्षेत्रामधील नागरीकांमध्ये सामाजिक अंतर राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे.
5. प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये सर्वश्रृत माध्यमांचा वापर करुन नागरीकांना एकत्र न येण्यास तसेच कोणतेही लक्षणे आढळल्यास तात्काळ संबंधीत क्षेत्रातील वैद्यकिय पथकासोबत संपर्क साधण्याचे आवाहन करणे.
6. संक्रमणाची साखळी तोडून नवीन क्षेत्रात त्याचा प्रसार रोखणे.

७. वयाच्या 60 वर्षावरील व्यक्ती ( Senior Citizen) यांना जूने आजार जसे, दमा, खोकला, अस्थमा, मधुमेह, निमोनिया, किंवा इतर संसंगजन्य आजार आहेत अशा आजारी व्यक्तीं यांची माहिती संकलीत करुन त्यांची आवश्यक ती तपासणी करणे.

८. कोवीड-19 या आजाराने ग्रस्त नसलेले ( NON-COVID) रुग्ण परंतू ज्यांना जूने आजार असल्याचा इतिहास आहे अशा रुग्णांची नियमित तपासणी करणे.

९. सिमांकित केलेल्या बाधीत क्षेत्राच्या परिसरामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 लावण्यात यावी. प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीस येणे-जाणे , किंवा मुक्त संचार करता येत नाही तसेच दुचाकी वाहन किंवा व्यक्तींच्या हालचालीवर प्रतिबंध राहील अश्या उपाययोजना करणे.

१०. प्रतिबंधीत क्षेत्रामधून कोणतीही व्यक्ती विना परवानगी बाहेर पडणार नाही याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करणे.

११. सद्यस्थितीमध्ये मुस्लीम बांधवाचा पवित्र रमजान महिना सुरु आहे. त्यामुळे मुस्लीम बांधव रोझे (उपवास) सोडण्याकरिता एकत्र येणार नाही याबाबत तपासणी व जनजागृती करणे नितांत गरजेचे आहे.

१२. सदर क्षेत्रामध्ये औषधीची दुकाने वगळता कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठाने उघडी राहणार नाही याची खबरदारी घेणे.

१३. रात्रीच्या वेळेस लोक एकमेकांना भेटनार नाहीत या बाबत आपआपल्या पथकामार्फत योग्य ती कार्यवाही करावी.

१४. प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये पोलीस विभागाने सर्व नागरीकांना घरीच बसण्याबाबत वाहनामधून गस्त घालुन सतत लाऊडस्पीकरद्वारे सूचित करावे.

१५. धार्मिक स्थळांमध्ये असलेल्या लाऊडस्पिकरद्वारे सर्व नागरीकांना घरीच बसण्याबाबत वारंवार विनंती करण्यात यावी.

अशा इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन कोरोना विषाणूचा प्रतिबंधातमक क्षेत्रामध्ये होणारा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याठी उपाययोना करणे नितांत गरजेचे झाले आहे.

सबब,आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, अकोला जिल्हयातील काही विषीष्ट भागामधील प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुभार्व व फैलाव होत असल्याचे निदर्शनास येत आहे. आपणास कळविण्यात येते की, जे क्षेत्र प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत केले आहेत. सदर ठिकाणी कोरोना विषाणूचा प्रादुभार्व व फैलाव होणार नाही याबाबत आपले अधिनस्त यंत्राणेंना आवश्यक ते निर्देश देण्यात यावे.

जिल्हादंडाधिकारी अकोला सत्यमेव जयते

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी,अकोला

NitinN 407